परिशिष्ट- क

**<u>प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाचे मागणीपत्र</u>**
राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कुलसचिव या संवर्गातील एकूण ३ पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत .

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग,
परिपत्रक क्रमांक: संकीर्ण १५१९ /प्र.क्र.१६/६-अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
५वा मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक — २५ जानेवारी, २०१९

## परिपत्रक

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/कार्यासन-१२, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतूदीस अनुसरुन कृषी विभागाच्या अधिपत्याखालील डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर या तीनही कृषी विद्यापीठातील खालील नमूद केलेले/केलेली पद/पदे त्या पुढे नमूद केलेल्या विहित वेतनश्रेणी मधील वेतनबँड व ग्रेड पे असलेल्या राज्यशासनाच्या सेवेतील कोणत्याही संवर्गामधून शासकीय अधिकाऱ्याकडून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी प्रतिनियुक्तीवर जाण्यासाठी उपलब्ध न झाल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत, लगतच्या निम्न संवर्गातील अधिका-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याचा विचार केला जाईल.

| पदाचे नांव | पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या | पदाचे विहित वेतनश्रेणी | आवश्यक पात्रता | ज्या संवर्गामधूनं भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| कुलसचिव | डॉ. बासाकोंकृवि, दापोली – १ पद<br><br>डॉ. पंदेकृवि, अकोला – १ पद<br><br>मफुकृवि, राहुरी – १ पद | रुपये ३७४००-६७००० + ग्रेड पे ८७०० | राज्य शासनाच्या सेवेतील विहित वेतनश्रेणीतील अधिकारी | राज्यशासनाच्या सेवेतील..........<br>१) विहित समकक्ष वेतनश्रेणीतील कोणत्याही संवर्गामधून, किंवा<br>२) विहित समतुल्य वेतनश्रेणीमधील समान वेतनबँड व ग्रेड पे मधील अधिकारी उपलब्ध न झाल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत, विहित वेतनश्रेणीच्या लगतच्या निम्न वेतनश्रेणीमधील वेतनबँड व ग्रेड पे च्या निम्न संवर्गातील अधिका-यामधून प्रतिनियुक्तीने ही पदे भरावयाची आहेत. |

२. प्रतिनियुक्तीचा कालावधी प्रथमत: १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील. त्यानंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्यांच्या संमतीने हा कालावधीत जास्तीत जास्त ३ ते ५ वर्षापर्यन्त वाढविता येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-ड) भरुन असे परिपूर्ण अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे/ संबंधित कृषी विद्यापिठाच्या संकेतस्थळावर जाहिरातीच्या दिनांकापासून ३ आठवड्यात (दिनांक.१५/२/२०१९ पुर्वी ) पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

५. ज्या अधिकाऱ्या विरुध्द म.ना.से (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु आहे किंवा त्याचे विरुध्द भ्रष्टाचार,लाचलुचपत गुन्हया संदर्भातील प्रकरण/फौजदारी प्रकरण/ अपसंपदा प्रकरण प्रलंबित अगर विचाराधीन आहे किंवा ज्या अधिकाऱ्या विरुध्द कोणत्याही प्रकारची शिक्षेची सध्या अंमलबजावणी चालू आहे अशा अधिकाऱ्यानी अर्ज करु नये/ अशा अधिकाऱ्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६.  प्रशासकीय विभागांनी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांच्या आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधित अधिकारी यांच्या मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालांच्या सत्यप्रतींसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५/२/२०१९ पुर्वी पाठवावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.

(नि.मो.थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२२०२ ३११६

प्रति,

१) सह सचिव/उप सचिव (आस्थापना), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

२) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे

त्यांना विनंती की, सदरहू मागणीपत्र आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये तातडीने निदर्शनास आणण्यात यावे.

३) उप सचिव (कार्यासन १२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

४) संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय

यांना विनंती की, प्रस्तुत मागणीपत्र मंत्रालयीन इंट्रानेटवरील संदेश फलकावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

५) कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी, /डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, /महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर

यांना विनंती की, प्रस्तुत मागणीपत्र आपल्या विद्यापिठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी. विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन आपल्या अभिप्रायासह उक्त अर्ज शासनास त्वरित सादर करण्यात यावेत.

## परिशिष्ट- ड

### प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | नाव(संपूर्ण नाव) | |
| २ | ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नाव | |
| ३ | अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण<br>ब) वेतनश्रेणी | |
| ४ | सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग | |
| ५ | जन्मदिनांक | |
| ६ | अर्ज सादर करण्याच्य अंतिम दिनांकास असलेले वय(वर्षे व महिने) | |
| ७ | शैक्षणिक अर्हता | |
| ८ | मागसवर्गीय प्रवर्गात येत असल्यास, प्रर्वग | |
| ९ | सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पुरते आहे,नियमित असल्यास नियमित दिनांक | |
| १० | अधिकारी/कर्मचाऱ्यांनी घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा | |
| ११ | शैक्षणिक अर्हता व अनुभव | |
| | शैक्षणिक अर्हता | १.<br>२.<br>३. |
| | अनुभव | १.<br>२.<br>३. |

<table>
<tr><td rowspan="5">१२</td><td colspan="4">आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील<br>( जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र जोडावे<br>व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी)</td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="2">कार्यालय/<br>विभाग</td><td rowspan="2">पद(संवर्ग अथवा<br>प्रतिनियुक्तीवर)</td><td colspan="2">कालावधी</td><td rowspan="2">वेतनश्रेणी</td><td rowspan="4">कामाचे स्वरुप</td></tr>
<tr><td>पासून</td><td>पर्यंत</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>संपर्क तपशील<br>अ) पत्ता<br>ब) कार्यालयीन<br>पत्ता</td><td colspan="5"></td></tr>
</table>

मी.श्री/श्रीमती................................असे प्रमाणित करतो/करते कि,मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करित असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करित आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

सही/-

(नाव)

पदनाम...................

प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशील

प्रमाणित करण्यात येते की,

१) श्री/श्रीमती.................................... पद..............................यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जा मध्ये दिलेली माहिती सेवा अभिलेखानुसार बरोबर आहे.

२) श्री/श्रीमती....................................पद..............................यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३) श्री/श्रीमती.....................................पद................................यांचे विरुध्द मनासे(शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही अथवा त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्हयासंदर्भातील प्रकरण,फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही

४) श्री/श्रीमती......................................पद..............................यांचे विरुध्द कोणत्याही शिक्षेची अमंलबजावणी सध्या चालू नाही.

५) श्री/श्रीमती ....................................यांना मागील दहा वर्षाच्या कालावधी मध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| पद | शिक्षेचे स्वरुप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६) प्रमाणित करण्यात येते की ,श्री/श्रीमती.........................हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १५ % पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७) श्री/श्रीमती............................यांना प्रतिनियुक्तीने......................या पदावर...........या कार्यालयात नियुक्त करण्यास या विभागाची हरकत नाही.

८) श्री/श्रीमती..........................यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सही/-

(नाव...................)

पदनाम................

दिनांक :-

..................विभाग)